# युगानुयुगांचे स्त्री दास्यत्व

**(महाभारतकालीन स्त्रियांची अंत:करणे उलगडणाऱ्या कथा)**

**अनंत तिबिले**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**युगानुयुगांचे स्त्री दास्यत्व : अनंत तिबिले**

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब–३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १६०/–

# युगानुयुगांचे स्त्री दास्यत्व

- गंगा / ७
- सत्यवती / ३२
- अंबा / ५७
- गांधारी / ८०
- गौतमी / १२५

# गंगा

देणाऱ्याने तिला भरभरून सौंदर्य दिलं होतं, हा का तिचा दोष होता? सौंदर्याबरोबर ती सदाचारी, सालस, सद्‌वर्तनी आणि निर्मळ मनाची होती. तिचं चारित्र्य निष्कलंक होतं आणि म्हणूनच तर स्वर्गलोकात, देवाधिदेवांच्या सहवासात वावरण्याची तिला संधी मिळाली होती.

त्या दिवशी तर देवगणांच्या महत्त्वपूर्ण सभेत उपस्थित राहाण्याचं तिला निमंत्रण मिळालं होतं आणि म्हणूनच ती सभेत प्रविष्ट झाली होती.

पण नेमक्या वेळी चंचल पवन तिच्या तलम वसनाशी अवखळ चाळा करेल, तिचा पदर उडेल आणि तिचा सुडौल यौवनभार उघडा पडेल, असं तिच्या स्वप्नातही नव्हतं.

तिने देवसभेत प्रवेश केला नि तिची नजर अगदी प्रथमच एका पुरुषावर पडली. तो पुरुष म्हणजे कुणी सामान्य व्यक्ती नव्हती. ईक्ष्वाकू कुलातले महाराजा महाभिष होते ते. एक अमोघ पराक्रमी, सत्यवचनी सार्वभौम राजा म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांनी हजार अश्वमेध आणि शंभर राजसूय यज्ञ करून देवाधिदेव इंद्राला प्रसन्न करून घेतले होते आणि त्यामुळेच त्यांना स्वर्गलोक प्राप्त झाला होता.

वयात आलेल्या प्रत्येक सुशील व सद्‌वर्तनी युवतीची एक अपेक्षा असते. भवितव्याबद्दलचं एक मनोहर स्वप्नच म्हणा ना त्याला.

आपल्या आयुष्यात पती म्हणून प्रवेश करणारा पुरुष जसा पराक्रमी असावा तसाच तो सद्वर्तनी नि सदाचारी असावी. त्याने आपल्या शौर्याने आपल्या कुलाची कीर्ती दिगंतरास पोहोचलेली असावी. तो आपल्याला अनुरूप नि सुंदर असावा आणि त्याने आपले भवितव्य उजळवून टाकावं. केवळ त्याच्या नावाचा आपल्याला अभिमान वाटावा. त्याच्या सहवासात आपलं जीवन सार्थकी लागावं. कृतार्थ वाटावं.

महाभिषांच्याबद्दल स्वर्गलोकात तिने अनेक गोष्टी ऐकल्या होत्या. अनेकांनी तिच्यापाशी त्यांचं वर्णन केलेलं होतं. पण त्यांना पाहाण्याचा योग आज अगदी पहिल्यांदाच आला होता.

आणि तिला जाणवले, आपण ज्यांच्याबद्दल बरंच काही ऐकलं ते महाराज महाभिष ऐकल्यापेक्षा अधिक बलदंड आहेत, धष्टपुष्ट आहेत. त्यांच्या शरीराचा अवयव नि अवयव प्रमाणबद्ध नि कमावलेला आहे आणि त्यांचं सौंदर्य.

आपला पदर पडलेला आहे, आपलं यौवन उघडं पडलेलं आहे, आपण देवसभेत उभ्या आहोत, या साऱ्याचाच तिला विसर पडला आणि ती एकटक महाभिषांच्याकडे पाहात राहिली.

महाभिषांचीही अवस्था त्याहीपेक्षा वेगळी नव्हती. तेही आपलं अस्तित्व विसरून तसेच तिच्याकडे अनिमिष नजरेने पाहात राहिले होते.

सौंदर्यावर कोण लुब्ध होत नाही? मोहक फूल कुणाच्या हृदयात आकर्षण निर्माण करीत नाही? चवदार मधुर फळांचा रसास्वाद घ्यावा असं कुणाला वाटत नाही? वरच्या असीम निरभ्र निलांगणाचं सुंदर पाहाण्याची इच्छा कुणाला होत नाही? एखाद्या डेरेदार वृक्षाच्या गडद शीतल छायेत क्षणभर विसावावं, असं कुणाला वाटत नाही? प्रभावतीचे आकाशातील नानाविध, पण सुखद रंग अवलोकनाचा मोह कुणाच्या मनात निर्माण होत नाही? संध्यासमयी आता आपला प्रियकर रविराजा परतणार, केवळ या कल्पनेनेच पश्चिमेच्या गालावर उमटलेले रंग न पाहाण्याचा अरसिकपणा कोण दाखवेल?

निसर्गाबद्दल जर आपलीही आसक्ती, मोह, आकर्षण, लुब्धता अशी असेल, तर मग माणूस म्हणून आपल्या जीवनाला हव्या असलेल्या स्वरूपसुंदर गोष्टीबद्दल आपल्यापाशी आकर्षण असणं वा आपण लुब्ध होणं, यात गैर ते काय आहे?

मग विधात्याने हे सौंदर्य निर्माण तरी केलं कशासाठी?

सौंदर्याबद्दल मानवी मनात आसक्ती तरी का निर्माण करावी?



सुंदरतेबरोबर कुरूपता, सत्याबरोबर असत्यता, चांगल्याबरोबर वाईट, पापाबरोबरच पुण्य आणि कर्तेपणाबरोबर नाकर्तेपणा विधात्याने का निर्माण करावा?

सामान्यांना विराट संकटात टाकण्यासाठी, त्यांचं मनोबल खच्ची करण्यासाठीच ना? मग सामान्य नि असामान्य हवंच होतं कशासाठी? यामागे काय हेतू होता निसर्गनिर्मात्याचा?

ती महाभिषांकडे पाहात होती नि ते तिच्याकडे पाहात होते. आपण देवसभेत उभे आहोत याचाही विसर पडला होता त्यांना.

''गंगेऽऽऽ'' कानावर हाक आली आणि ती भानावर आली. आपला पदर ढळलेला आहे, हे आता कुठे तिच्या ध्यानी आले. तिने चटकन पदर सावरला आणि आपला यौवनभार झाकला.

आपण देवसभेत उभे आहोत हेही लक्षात आलं तिच्या. पण तिला अपराध्यासारखं वाटण्याऐवजी काहीसं लाजल्यासारखं झालं. तिची नजर खाली घरंगळली.

''गंगेऽऽऽ'' पुन्हा हाक आली.

''जी, देवाधिदेवा?''

''आजवर आम्ही तुला सुशील, सद्वर्तनी, सदाचरणी समजत होतो...''

ती काहीच बोलली नाही. देवाधिदेव काय बोलतात हे ऐकायला अधीर बनली.

''पण आमचा तो गैरसमज होता...'' इंद्रदेव उद्गारले.

देवसभेत बोलणं म्हणजे आपली मर्यादा सोडणं आहे, देवगणांचा आपल्यावर रोष ओढवून घेण्यासारखं आहे, हे ती जाणत होती.

खरं तर ती कुणी सामान्य स्त्री नव्हती.

जन्हु ऋषींची कन्या गंगा होती ती.

तिच्या मनात विचार आला, आजवर आपल्या तीरावर अनेक ऋषिमुनींनी आश्रय घेतला. त्यातल्या प्रत्येकाने आपली तपश्चर्या फळास नेली. आपलं साध्य साधून घेतलं. त्यातले कितीतरी ऋषीवर सुंदर होते, ध्येयवादी होते. कठोर तप:साधना करणारे होते. कुणाही स्त्रीने अनुरक्त व्हावं असं त्यांचं कर्तृत्व होतं. पण तरीही आपलं मन पाघळलं नाही. कुणावरही आसक्त झालं नाही. त्यातला कुणीही आपल्याला हवाहवासा वाटला नाही आणि आपल्या मनात त्यातील एकाहीबद्दल आकर्षण वाटले नाही. त्यांच्यातील कितीतरी ऋषिवर इतके कर्तबगार होते की,

त्यांच्यापैकी एकाला जरी तिने निवडले असते, तर तातांनी आनंदाने तिचा विवाह त्यांच्याशी घडवून आणला असता.

पण तिच्या मनात मोह, आकर्षण आदी भावनाच नव्हत्या. विकारही तिच्या मनाला कधी शिवला नव्हता. ती पवित्रच होती. काया-वाचा-मने करून ती तिच्या विचारांशी एकनिष्ठ होती.

तिच्या वयाच्या सौंदर्यवतींचं नि नुकत्याच यौवनात प्रवेश केलेल्या स्त्रीचं केवळ एकच स्वप्न असतं.

आपल्याला मनासारखा जोडीदार मिळावा.

तो पराक्रमी असावा.

त्याचं आचरण जलासारखं पवित्र असावं आणि त्याने आपल्या कर्तृत्वावर आपलं मन जिंकावं.

त्याच्या स्वाधीन आपलं सर्वस्व अर्पण करून आपण आपलं अस्तित्वच विसरून जावं- स्वत:ला सर्वार्थाने त्याच्या स्वाधीन करून आपण निश्चिंत व्हावं.

पण हा असा विचार तिच्या मनात कधी डोकावलाच नाही.

तिचं मन कुठे गुंतलेच नाही.

तिचं मन विकारी वासनेच्या अधीन कधी झालंच नाही.

ती पूर्वी जशी होती तशीच राहिली.

पवित्र, सत्शील, निष्पाप, निरागस, जलासारखी पवित्र आणि म्हणूनच तर इंद्राने तिला स्वर्गलोकात वावर करण्याची संधी दिली. पण आज तोच तिच्या चारित्र्याबद्दल संशय घेत होता. तिला दुराचरणी ठरवून मृत्युलोकात तिची रवानगी करू पाहात होता.

हे करीत असताना त्याने तिच्या पूर्वायुष्याचा मुळीसुद्धा विचार केलेला नव्हता आणि तरीही ती काही बोलू शकत नव्हती.

कारण काही वेळ का होईना, महाराजा महाभिष यांच्याकडे एकटक पाहाण्याचं. त्यांच्याबद्दल आकर्षण वाटावं असं तिच्या हातून घडून गेलं होतं. प्रत्यक्ष देवदेवतांच्या हजेरीत तिच्याकडून हा अविचार झाला होता.

ती आणखीन किती वेळ स्वत:च्याच विचारात गुरफटून गेली असती कुणास ठाऊक; पण त्याच वेळी इंद्रदेवांचे कठोर शब्द तिच्या कानांवर आले. ते महाराजा महाभिषाला उद्देशून म्हणत होते, ''हे दुर्मते, तूही मृत्यूलोकी जन्म पावशील आणि



जिच्यामुळे तुझे मन चळले ती ही गंगाही मृत्युलोकी जन्म घेईल आणि तुझी भार्या बनेल. मात्र ती मृत्युलोकात सगळ्या गोष्टी तुझ्या इच्छेविरुद्ध करेल आणि जेव्हा तुला तिच्या कृत्याचा राग येईल, तेव्हाच तुझी या शापातून मुक्तता होऊन तू परत स्वर्गलोकात येशील.''

इंद्रदेवांच्या शापाने आपण मत्युलोकी जाणार हे ज्या वेळी तिला कळले, त्याच वेळी राजा महाभिषही मृत्युलोकात जन्म घेणार आणि आपल्याला त्यांची भार्या बनण्याचा अधिकार प्राप्त होणार हे ऐकून क्षणभर गंगा सुखावली. आपल्याला हवी ती साथ मिळत आहे, याचा तिला केवढा तरी आनंद झाला पण...

तिचा हा आनंद फार काळ टिकला नाही.

कारण इंद्र पुढे म्हणाले होते, ''तुम्ही दोघे पती-पत्नी झालात तरी तुझी पत्नी तुझ्या इच्छेप्रमाणे कधीच वागणार नाही आणि जेव्हा तुला तिच्या विरोधी वागण्याचा राग येईल, त्याच वेळी तुझी मृत्युलोकातून सुटका होईल.''

देवाधिदेवांच्या दरबारात पाहाताक्षणीच ज्यांच्यावर आपलं मन जडलं, ज्याच्या पराक्रमाच्या यशोगाथा ऐकून ज्याच्यावर आपण अनुरक्त झालो, ज्याला सर्वस्व अर्पण करण्याचा विचार तत्काळ आपल्या मनात डोकावला, ज्याचं भार्यापद प्राप्त होणार केवळ या विचाराने आपलं रोमरोम पुलकीत झालं, मन मोहरलं- बहरलं, खरं तर अशा पुरुषाला नित्य प्रसन्न ठेवणं हेच आपलं कर्तव्य. जेणेकरून आपला पती सतत प्रसन्न राहील यासाठी प्रयत्न करणं, प्रत्येक विवाहित स्त्रीच्या जीवनाचं सार. तिने त्याच्यासाठी आपलं जीवन व्यतीत करायचं. आणि आयुष्याच्या अंतापर्यंत हीच साथ मिळावी अशी अपेक्षा करायची.

तिच्या माथी हे कठोर कर्म यावं?

नित्य त्याच्या इच्छेविरुद्ध वागण्यास भाग पडावं?

त्याला सदा दुखवावं?

त्याच्या मनाला क्लेश द्यावेत?

जेणेकरून तो दु:खी होईल यासाठीच प्रयत्न करावा लागावा?

खरं तर कुणाही स्त्रीला हे अशक्यच;

तिचं मनही या गोष्टीला तयार नव्हतं.

पण इंद्रदेवांचा शाप.

या शापापुढे तिच्या इच्छेला मुळी किंमतच नव्हती. जे घडणार होतं-

घडायला हवं होतं, ते त्यांच्या शापानुसार–

गंगेचा आनंद मावळला. ती दु:खी झाली, ती यामुळे–

आणि मग जड अंत:करणाने देवसभेतून बाहेर पडली.

ती काही अंतर चालून आली असेल नसेल–

त्याच वेळी आठ तेजस्वी पुरुष तिच्यासमोर हात जोडून उभे राहिले. तिने त्यांना चटकन ओळखले.

ते अष्टवसू होते स्वर्गलोकीचे देव.

पण त्यातील प्रत्येकाचा चेहरा निराशेने काळवंडला होता. प्रत्येक जण उद्ध्वस्त वाटत होता. कुठली तरी खंत त्यांना आतल्या आत खात होती आणि तिच्या वेदना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे प्रतीत होत होत्या.

गंगेला या गोष्टीचं आश्चर्य वाटलं.

ती क्षणभर महाराज महाभिषांचं उदात्त रूप विसरली.

तिने काहीशी चिंतेच्या स्वरात विचारले,''तुम्ही सगळं असे निस्तेज का दिसता? स्वर्गलोकीचे देव कुशल आहेत ना?''

''देव कुशल–मंगल आहेत, फक्त आम्ही अष्टवसू...''

''कोणती चिंता ग्रासून राहिली आहे आपल्याला?''

''गंगे, ही आमच्याच कर्माची फळं आहेत.''

''तुम्ही काय बोलता आहात हे ध्यानी आलं नाही आमच्या.''

''महानदी, एकदा आम्ही अष्टवसू आपापल्या पत्नीसमवेत वनविहार करायला मृत्युलोकी गेलो होतो. तिथलं ते सुरम्य वातावरण आम्हाला भावलं. नदीतीर, तीरावरची घनदाट झाडी, नानाविध पक्ष्यांचा स्वैर विहार, अंगावर रोमांच उत्पन्न करणारा शीतल वारा, मृग–मयुरादींचा मुक्त संचार हे पाहून आम्ही सगळेच भारावून गेलो. आम्ही वनविहारातील सुख उपभोगत असतानाच आमच्यातला एक वसू आपल्या पत्नीसमवेत विश्रामासाठी पहुडला होता. त्याच वेळी त्याच्या पत्नीच्या नजरेत एक गाय व वासरू भरले. गाईची शेपटी, सुंदर खूर, काळेभोर डोळे पाहून द्युची पत्नी त्या गाईच्या मोहातच पडली आणि द्युला ती गाय दाखवत म्हणाली,''नाथ, ती गाय पाहिलीत?''

''तिलाच पाहातो आहे.''

''सुंदर आहे नाही?''



''अप्रतिम !''

''ही अशी गाय नि वासरू आपल्याकडे असावं असं नाही आपल्याला वाटत?''

''तू केवळ गाईचं सौंदर्य पाहून तिच्या मोहात पडली आहेस. पण त्या गाईचं जे वैशिष्ट्य आहे ते मात्र तुला ठाऊक नाही.''

''ते स्वामींनी आम्हांला सांगावं.''

''प्रिये, ही कामधेनू वसिष्ठ ऋषींची आहे. त्यांचा होमहवनादी नित्यविधी यथासांग चालावा म्हणून ही त्यांना गाय प्राप्त झाली आहे. ही गाय तशी सर्वसामान्य नाही. दक्षाला सुरभि नावाची एक अति सुंदर नि लावण्यवती कन्या होती. कश्यप ऋषी तिच्यावर भाळले आणि मग त्या दोघांच्या मीलनातून या गाईचा जन्म झाला''

''मग तर ही गाय मला हवीच, नाथ.''

''तिचं आणखीन एक वैशिष्ट्य ध्यानी घे.''

''कोणतं?''

''जो या गाईचं दूध प्राशन करेल तो दहा हजार वर्षे जगून जन्मभर तरुणच राहील.''

''नाथ, आपण स्वर्गलोकीचे. आपल्याला मृत्यू वा वार्धक्याचं भय नाही. पण...''

''पण काय,प्रिये?''

''मर्त्यलोकात माझी एक सखी आहे. तिचं नाव जितवती. फार सुंदर आणि तरुण आहे. शिवाय एक राजाची कन्या आहे. मी जर का ही गाय व वासरू तिला भेट म्हणून दिलं, तर ती दहा हजार वर्षे जगेल नि सतत तरुण राहील. नाथ, केवळ माझ्या या सखीसाठी का होईना आपण माझा हा हट्ट पुरवा.''

''ठीक आहे प्रिये, आम्ही तुझा हा हट्ट पुरवू.''

आणि द्युने त्या गायवासरू दोघांनाही पकडले आणि त्यांना आपल्याबरोबर घेऊन निघाले. खरं तर वसिष्ठांच्या अनुज्ञेविना गाय व वासरू नेणं अपराध होता. पण केवळ पत्नीवरील प्रेमामुळे तो त्याच्या ध्यानात आला नाही. निदान आम्ही तरी, ही गोष्ट सर्वसामान्य नसून हा वसिष्ठांसारख्या श्रेष्ठ ऋषींचे मन दुखविण्याचा प्रकार आहे, हे ध्यानी घ्यायला हवं होतं. पण वनविहाराने धुंद झालेलं आमचं मन... त्याने या गोष्टीचा विचारच केला नाही. त्याला आपला अपराध कळलाच नाही.''

''त्यामुळे वसिष्ठ रागावले का?''

''नुसते रागावलेच नाहीत, तर त्यांनी आमच्या अपराधाचं शासन म्हणून आम्हाला शाप दिला आहे.''

''कोणता?''

''आम्ही मर्त्यलोकी जन्म घेऊ असा.''

''आपण त्यांच्याकडे क्षमा मागितली नाही?''

''मागितली, पण हे महानदी, वसिष्ठांसारख्या श्रेष्ठ मुनिवरांच्या मुखातून बाहेर पडलेले शब्द कधीच व्यर्थ जात नाहीत. धनुष्यातून सुटलेला शर जसा आपलं लक्ष्य साध्य करतो, त्याप्रमाणेच वसिष्ठांचे शब्द. ते वाया जाणार नव्हतेच. तरीही आमची दया येऊन त्यांनी आम्हाला एक वचन दिले आहे आणि ते म्हणजे आम्ही केवळ एक वर्षच मनुष्यलोकी राहू. मात्र द्यु आपल्या केल्या अपराधाचं फळ म्हणून अनेक वर्ष मानवयोनीतच राहील. तो धर्मात्मा आणि सर्वशास्त्रसंपन्न होईल. आपल्या पित्याच्या इच्छेसाठी स्त्रीसंगाचा त्याग करील. साहजिकच त्याला संतती होणार नाही.''

''माझ्याकडून आपली काय अपेक्षा आहे, देववर?''

''देवी, कुणा मर्त्यलोकातील स्त्रीच्या उदरी जन्म घेण्याची आमची मुळीसुद्धा इच्छा नाही.''

''मग...''

''महानदी, आपणही मर्त्यलोकी जाणार आहात असं आम्हास कळलं...''

''जावंच लागेल. तशी विधात्याची आज्ञा आहे.''

''मग आमची इच्छा सफल होईल.''

''कोणती?''

''आपण कुणी सामान्य स्त्री नाही. स्वर्गलोकात वावर आपला. प्रत्यक्ष देवतांच्यात आपली गणना केली जाते.''

''खरं आहे ते.''

''मग आपल्याच पोटी आम्हांला जन्म देण्याचे उपकार करून आम्हांस कृतकृत्य करा.''

''आपल्या इच्छेप्रमाणे होईल.''

''पण आमची एक अट आहे, देवी...''

''आज्ञा करा...''



''आमचा जन्म होताच आपण आम्हांस नदीत सोडून द्यावे.''

''म्हणजे जन्मत:च तुम्हाला मारावे?''

''होय महानदी, आम्हास अधिक काळ मनुष्ययोनीत राहायची इच्छा नाही. आम्ही त्वरित स्वर्गलोकी जाऊ इच्छितो आणि आपण जन्मत:च आमची हत्या केल्याशिवाय आमची इच्छा सफल होणे नाही.''

''केवळ आपल्या मुक्ततेसाठी बालहत्येचं पातक मी माझ्या शिरावर घ्यायचं? प्रत्यक्ष स्वत:च्या हाताने पोटच्या पोरांना जन्मत:च मारायचं?''

''देवी, आमच्या इच्छेस्तव आपल्याला हे करावंच लागणार आहे.''

तिला क्षणभर वाटले, त्यांना विचारावे, 'मी हे कशासाठी करावे? आपण देववर आहात म्हणून? खरं तर आजपावेतो आमचं जीवन निर्मळ होतं, सदाचारी होतं, मोहहीन होतं. ऐन तारुण्यातही आम्ही वासनेला आमच्या जवळही फिरकू दिलं नव्हतं. आमचं निष्कलंक चारित्र्य पाहूनच देवाधिदेव इंद्रांनी आम्हाला स्वर्गलोकी प्रवेश दिला होता. पण त्यासाठी आम्ही आमचं आजवरचं जीवन पणाला लावलं होतं. पण केवळ एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं. महाराजा महाभिषांना आम्ही पाहिलं, पाहाताक्षणीच त्यांच्यावर अनुरक्त झालो. सारं भान विसरून त्यांच्याकडे पाहात राहिलो – बस्स ! एवढाच आमचा अपराध. पण असे अपराध देवलोकी कुणी केलेच नव्हते? देवाधिदेव इंद्र विवाहित असूनही गौतम ऋषिपत्नी अहिल्येच्या मोहपाशात अडकून केवळ तिचा उपभोग घेण्यासाठी त्यांनी गौतमाचं रूप घेऊन पापाचरण केलंच होतं ना? त्यांचा हा अपराध मोठा की, आमचा? मग त्यांना का शिक्षा नाही? आम्हांलाच का? वसिष्ठांचा अपराध तुम्ही केला, त्यांच्या अनुज्ञेविना त्यांची गाय व वासरू पळविलेत. त्यांनी संतापून तुम्हाला मनुष्ययोनी दिली, यात त्यांचं काय चुकलं? अपराध्याला प्रायश्चित्त मिळायलाच हवं, हा नीतीनियम आहे. मग तो त्यांनी का भोगू नये? माझ्यासारख्या निष्पाप, निष्कलंक स्त्रीला का भोगावा लागावा? स्त्री म्हणजे यांच्या लेखी कुणीच का नव्हे? स्त्री... हो, तिला उचित–सुयोग्य पुरुषाचा सहवास हवाच असतो. पुरुषांना तो नको असतो का? पुरुष केवळ स्त्रीमीलनाच्या सुखासाठी आतुर असतो. आपली इच्छापूर्ती झाली की, मग तो जिने आपल्याला सुख दिले तिचा विचारही करायला तयार असत नाही. परंतु स्त्री केवळ पुरुषसमागमे तृप्त होत नाही. तिला मातृत्व हवं असतं. मातृत्वाविना आपलं जीवन फोल आहे असं ती समजत असते. मी वसूंना आपल्या पोटी जन्म देण्यास

तयार झाले आहे. पण मला क्षणभराचं मातृत्व नको आहे. नऊ मास नऊ दिवस उदरी वाढवलेल्या जिवाला मरणयातना झेलून त्याला जन्म देण्यात तिला कृतार्थता वाटते. असं असताना ज्याला जन्म द्यायचा त्यालाच तत्काळ मारून टाकायचे, हे कोणती स्त्री स्वीकारेल? केवळ पुरुष म्हणून जो कुणी स्त्रीला पापकर्म करायला भाग पाडेल तो केवळ आपलं पुरुषत्व गाजविण्यासाठीच होय, असं म्हटलं तर त्यात वावगं काय?''

तिला आणखीन एक प्रसंग आठवला.

विश्वामित्र खडतर तपश्चर्येला बसले होते.

त्यांची ही तपस्या पूर्ण झाली तर आपलं आसन स्थिर राहील की नाही, याची चिंता देवाधिदेव इंद्राला झाली. खरं तर देवाधिदेव इंद्राकडे विश्वामित्रांची तपश्चर्या भंग करण्याचं सामर्थ्य होतं. असायलाच पाहिजे होतं.

पण एखाद्याच्या साधनेत व्यत्यय आणणं पाप आहे, हे ते जाणून होते.

म्हणूनच तर त्यांनी त्या क्षणी स्त्रीचा उपयोग केला.

कारण त्यांच्या दृष्टीत स्त्री सामान्य आणि क:पदार्थ होती.

तिला भावभावना असण्याचं कारणच नव्हतं. तिचे चारित्र्यही त्यांच्या दृष्टीने नगण्य होतं. म्हणूनच तर त्यांनी विश्वमित्रांच्या तपोभंगाचं कार्य मेनकेवर सोपवलं. मेनका- एक स्त्री. तिच्या भावभावनांचा विचार करण्याची गरज इंद्रदेवांनाही जाणवली नाही. मेनका एक दुबळी स्त्री. तिला स्वतंत्र अस्तित्व नव्हतं. तिने इंद्राची आज्ञा स्वीकारली. आपलं सौंदर्य नि नृत्यकलेतील नैपुण्य यांच्या जोरावर विश्वमित्रांचा तपोभंग केला आणि स्वत:ला सर्वश्रेष्ठ ऋषिवर समजणाऱ्या विश्वमित्राने कामविव्हल होऊन तिचं चारित्र्य लुटलं. तिच्यावर मातृत्व लादलं. इंद्र आपला हेतू साध्य झाला म्हणून समाधान पावले आणि स्त्रीसमागमात सुख पावून विश्वमित्र तृप्त झाले आणि मेनका मात्र शीलभ्रष्ट झाली. तिने मातृत्व पत्करले, तेही एका मुलीचं - शकुंतलेचं! पुरुष आपल्या बलाचं श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी साधन म्हणून स्त्रीचा उपयोग करतात आणि आपलं साध्य ध्येय होताच त्या स्त्रीला केरकचऱ्यासारखे बाजूला करतात, हे योग्य आहे का?

याचा अर्थ स्त्री एक नगण्य वस्तूच झाली नाही का?

गरज असेपर्यंत तिला वापरली नि मग तिला अडगळीत फेकून दिली. नुसत्या मेनकेचेच हे असं झालं असं नाही. तिच्या मुलीच्या - शकुंतलेच्या - दैवी हेच आले.



कण्व ऋषींच्या आश्रमात दुष्यंताने शकुंतलेला पाहिलं. प्रथमदर्शनीच तिच्या असामान्य रूपाने त्याला मोहित केलं. त्याने कण्वांच्या अनुमतीने शकुंतलेशी विवाह केला. काही काळ तिच्यासमवेत राहिला आणि मग निघून गेला.

दुर्दैवाने त्याने भेट दिलेली अंगठी नौकाविहार करीत असताना शकुंतलेच्या बोटातून निसटली आणि ती एका माशाने गिळली.

आणि जेव्हा आपल्या पतिगृही जाण्याला उत्सुक असलेली शकुंतला दुष्यंताकडे पोहोचली, तेव्हा तिच्याकडे केवळ आपण दिलेली अंगठी नाही असं पहाताच त्याने शकुंतलेचं पत्नीपद नाकारलं? आपण तिला ओळखलं नसल्याचं सहज सांगितलं. हे योग्य आहे का ?

तिच्या केवळ सौंदर्यावर भाळून ज्याने तिच्याशी लग्न केलं, तिचं निष्पाप कौमार्य लुटलं, जिच्याशी कित्येक दिवस समागम केला, जिचं अंग-अंग चाचपलं, जिच्या अंगोपांगाचं स्पर्शसुख मिळवून जो संतोषला, त्याला तिच्यापेक्षा तिला आपण दिलेल्या अंगठीचं महत्त्व वाटावं? आपलं सर्वस्व प्रदान करणाऱ्या स्त्रीला त्यानं हीन लेखावं, हा स्त्रीत्वाचा अपमान नव्हता का?

एका जिवंत मानवी स्त्रीने विश्वासानं आपलं सर्वस्व अर्पण करावं आणि केवळ अल्प किमतीच्या निर्जीव अंगठीला त्याहीपेक्षा अधिक मोल द्यावं.

याचा अर्थ स्त्रीच्या त्यागाला काहीच महत्त्व नसावं?

तिच्यापेक्षा अल्प किमतीची अंगठी श्रेष्ठ ठरावी?

ती अंगठी एका धीवराला सापडली नसती तर? ती राजमुद्रा अंगठी आहे, हे ओळखून त्याने ती दुष्यंताला परत केली नसती तर?

शकुंतला अकुलिना ठरली असती ना?

तिच्या पोटात वाढणारा दुष्यंताचा गर्भ अनौरसच ठरला असता ना? त्याला समाजाने पाप हीच संज्ञा दिली असती ना?

मग शकुंतलेचं काय झालं असतं?

तिच्यापुढे आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय उरला असता का?

का?

शकुंतला स्त्री होती म्हणूनच ना?

मेनका स्त्री होती म्हणूनच ना?

आणि आपणही एक स्त्री आहोत म्हणूनच ना?

विश्वासघातानं गौतमी पत्नी अहिल्येकडून समागमाचं सुख प्राप्त करणारा देवाधिदेव इंद्र दोषी नाही?

आपलं शील विश्वमित्राच्या पदी अर्पण करण्याची अनुज्ञा देणारा देवाधिदेव इंद्र अपराधी नाही ?

आणि विवाहानंतर आपलं सर्वस्व अर्पण करणाऱ्या शकुंतलेजवळ केवळ अंगठी हरवली म्हणून पतिता ठरण्याचा ज्याने प्रसंग आणला, तो दुष्यंतही दोषी नाही?

अरे, स्वत:चं श्रेष्ठत्व सिद्ध करावयाचं असतं, तर ह्या पुरुषांनी आपलं सामर्थ्य पणाला लावायला हवं होतं. स्त्रीच्या आडपडद्याचा वापर करून आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्नही केला नसता.

पण स्वत:ला देव, देवाधिदेव अशी उपाधी प्राप्त करणाऱ्यांनी यातलं काहीच केलं नाही.

त्यांनी स्त्री, तिचं शील, तिचं सदाचरण, तिचं पावित्र्य पणाला लावलं.

ज्याचं त्यांच्या दृष्टीनं काहीही महत्त्व नव्हतं.

हे योग्य होतं का?

या स्त्रियांचा कोणता अपराध होता म्हणून हे सगळं त्यांच्या दैवी आलं?

स्त्री ही एक माणूस आहे, याचा देवादिकांनी विचार केला होता?

स्त्रीच्या भावभावना त्यांनी जाणल्या होत्या?

त्यांनीही स्त्री एक भोग्यवस्तू आहे, तिच्या सौंदर्यावर आपण आपलं ईप्सित साध्य करायचं, एवढाच विचार होता ना त्यांच्या मनात?

होय! हेच सत्य आहे. अन्यथा आपल्यावर हा प्रसंग आलाच नसता.

पवनाने अवखळपणा करून माझा पदर उडविला हा का माझा दोष आहे?

त्याच वेळी महाराजा महाभिष माझ्या नजरेस पडावेत हे मी तर ठरविलेले नव्हते?

तो एक योगायोग होता.

पण अविवाहित स्त्रीने आपल्या स्वप्नातला पुरुष पाहाणं यात नक्कीच नियतीचा संकेत होता.

म्हणूनच तर त्यांच्याकडे एकटक पाहाण्याचा मोह मला झाला.

मलाही प्रथमदर्शनीच तो नरोत्तम भावला.

मी त्याच्याकडे पाहिले. पाहातच राहिले. पदर घसरल्याचं, उन्नत उरोभाग उघडा पडल्याचं माझ्या ध्यानी आलं नाही.



अपराध घडला माझ्या हातून. नकळत मर्यादा उल्लंघली गेली माझ्याकडून, त्याचं प्रायश्चित्त कडेलोट?

स्वर्गातून थेट मनुष्य योनीत?

हे प्रायश्चित्त अति झालं नाही का?

तिने स्वत:ला विचारले. देवाधिदेव इंद्रालाही हाच प्रश्न विचारण्याचा तिला मोह झाला. पण तिने स्वत:ला आवरले. आपण प्रश्न विचारल्याने देवाधिदेव कोपतील नि न जाणो, आपल्याला आणखीन जबरदस्त शिक्षा करतील, केवळ या कारणानेच तिने स्वत:चे तोंड बंद ठेवले.

नाहीतरी स्त्रीने तोंड बंदच ठेवायचे असते.

हा इथला रिवाज आहे.

तिला काही विचार-आचार, आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध ब्र काढण्याचा अधिकारच नाही. तिने केवळ सहन करायचं, पुरुषाच्या तालावर नाचायचं.

एखाद्या बाहुलीसारखं त्याचं मन रिझवायचं.

गंगेने ते निमूटपणानं स्वीकारलं.

ती मृत्युलोकी निघालीही.

आणि त्याच वेळी कोणतीही स्त्री पत्करणार नाही एवढी जबाबदारी अष्टवसूंनी तिच्यावर सोपवली.

स्वत:च्या मुक्ततेसाठी तिने त्यांना जन्म द्यायचा आणि जन्मताच नऊ मास नऊ दिवस उदरात बाळगलेल्या, असह्य यातना सहन करत जन्म दिलेल्या आपल्या पोटच्या गोळ्याला मारायचे, एकदा नव्हे सात वेळा !

कोणती स्त्री हे अघोरी कर्म करील?

कोणती माता पोटच्या पोराला मृत्यूच्या अधीन करेल?

कोण पुत्रहत्या करायला तयार होईल?

पण तिने हे सारं कबूल केलं. कारण ती एक स्त्री होती. पुरुषांच्या सर्व सुखांचं साधन. पुरुषांचा कोप होऊ नये, त्यांनी आणखीन काही शाप देऊ नये आणि आपल्या वाट्याला आणखीन काही भयंकर येऊ नये म्हणून. केवळ म्हणूनच तिने हे स्वीकारलं. अष्टवसूंना हवं ते दिल्यानंतर तिने विचारलं, ''देववर, मला आता मर्त्यलोकात जाणं भागच आहे. देवेंद्रांच्या इच्छेप्रमाणे महाभिषांची भार्या होणं प्राप्तच आहे. पण महाबली महाभिषांना मी ओळखायचं कसं? मला अन्य कुणाशीच विवाह करायचा नाही.